Impact Factor 6.261 ISSN :
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. (II)
12 January 2019 Special Issue – 92

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान



राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Gangane R.V.
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. M.S. Kamble
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान


| | | | |
|---|---|---|---|
| 28. | हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान | प्रा.डॉ.साईनाथ शेटोड | 67 |
| 29. | क्रांतीकारी महिला - डॉ. कॅप्टन लक्ष्मी सेहगल | प्रा. सौ. शिंदे अनिता व्यंकटराव | 69 |
| 30. | भारतीय स्वातंत्र्य लढयात डॉ. ॲनीबेझट यांच्या कार्याचा अभ्यास | डॉ.पवार रामचंद्र पांडुरंग | 72 |
| 31. | यादवकालीन स्त्री जीवन आणि संत जनाबाईचे अभंग | प्रा.डॉ.चत्रभुज नारायणराव सोळंके | 75 |
| 32. | शोदाबाई सावरकर यांचे स्वातंत्र्यलढयातील योगदान | प्रा. शिल्पा शेटे | 78 |
| 33. | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महत्त्वपूर्ण महिला क्रांतिकारक | प्रा.बंडे धनराज वैजनाथ | 80 |
| 34. | महाराणी येसूबाई यांचे खंबीर नेतृत्व | प्रा. डॉ कृष्णा मालकर | 83 |
| 35. | 19 व्या शतकातील बहुजन समाजातील स्त्रियांचे प्रश्न क्रांतिकारी विचाराने मांडणारी स्त्री ताराबाई शिंदे | डॉ.एस.डी. सावंत | 86 |
| 36. | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान | कुरिल मिनाक्षी पुनमचंद | 89 |
| 37. | हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्त्रियांचे कार्य | प्रा. रामभाऊ देवराव काशीद | 92 |
| 38. | समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य | प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव | 95 |
| 39. | किसान सभेच्या इतिहासातील पहिल्या स्त्री शेतकरी नेत्या - कॉ.गोदावरीताई परुळेकर | डॉ. मुकुंद अरविंद देवर्षी | 97 |
| 40. | स्वराज्य हित रक्षण करणारी महाराज्ञी येसूबाई | प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस. | 100 |


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



25

ISSN- 2348-7143
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान
12 January 2019
UGC Approved No. 40705

# स्वराज्य हित रक्षण करणारी महाराज्ञी येसूबाई

प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस.
इतिहास विभाग प्रमुख , शिवाजी कॉलेज हिंगोली

---

प्रतावना –

राजमाता, राष्ट्रमाता, मा जिजाऊ यांच्या आशीर्वादाने व शहाजी महाराज यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या स्वराज्याचे अनेक भागीदार आहेत. सर्व जाती-धर्मातील लोकांच्या बलिदानातून हे 'स्वराज्य' उभे राहिले आहे. यामुळेच प्रत्येक वेळी शिवाजी महाराज हे स्वराज्य रयतेचे आहे, कोन्या एकाच्या मालकीचे नव्हे, असे वारंवार स्पष्ट करत होते. शिवाजी महाराजांच्या विचारचीच परंपरा छत्रपती संभाजी महाराजाने पुढे चालवीत 'स्वराज्य' हे फक्त आणि फक्त रयतेचे आहे. रयतेच्या आणि स्वराज्य हिताच्या आड येणारा प्रत्येक व्यक्ति हा स्वराज्य द्रोही आहे. शिवकाळात स्वराज्य हित प्रथम हे मानणारी राजमाता जिजाऊ नंतर शिवकाळात निर्माण झालेली स्त्री म्हणजे राणी येसूबाई होय. मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पत्नी राणी येसूबाई यांचे स्थान वेगळे आहे. इ.स. १६६१ मध्ये महाराजांनी दक्षिण कोकण वर स्वारी करून शृंगारपूरच्या सूर्याजीराव सुर्वे यांचे राज्य जिंकून घेतले. सूर्याजीराव पळून गेले, पण त्यांचे कारभारी पिलाजीराव शिर्के महाराजांच्या सेवेत आले. त्यांची कन्या येसूबाई उर्फ राजसबाई यांचा विवाह छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी इ.स. १६६५ ला झाला. अनेक ऐतिहासीक नोंदीवरून शिवाय अनूपुराणकाराने संभाजीची पत्नी 'राजसा' ही शिर्के कुळातील होती, असे सांगितले आहे. 'याचा अर्थ संभाजीच्या पत्नीचे माहेरचे नाव जिऊबाई वा राजसबाई, सासरचे नाव येसूबाई समजण्यास हरकत नाही'[१] लग्नानंतर येसूबाईचे भाग्य कि, छत्रपती संभाजी महाराजांबरोबर लहान वयातच राष्ट्रमाता जिजाऊकडून प्रत्यक्ष राजकरणाचे धडे घेण्याची संधी मिळाली. संभाजी राजेंना राष्ट्रमता जिजाऊंचे जे वात्सल्य व मार्गदर्शन लाभले, ते रानी येसूबाईंनाही लाभले. जिजाऊंनी जसे दोन छत्रपती घडवले, असे इतिहास सांगतो. तसेच भोसले घराण्यास शोभावी अशी सून ही घडविली, याला इतिहास साक्षीदार आहे. शिवाय छत्रपती शिवाजी महाराजही प्रत्येक्ष राजकारभारची येसूबाईंना जाणीव करून देत असत. राजमाता जिजाऊ व राजे शिवाजी यांच्या तालमीत संभाजी राजे व येसूबाई राजकरणाचे धडे घेत होते, कारभाराचे डावपेच शिकत होते. येसूबाई मोठी शाहनी, व्यवहारचतुर व धीरोदात्त स्त्री होती.[२] असे इतिहास सांगतो· येसूबाईच्या कर्तुत्वामुळेच छत्रपती शिवाजी महाराज यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या निर्वानानंतर शिक्के कठ्यारीचा अधिकार येसूबाई यांच्याकडे दिला. येसूबाईनी दिलेली जवाबदारी चोख बजावली. उद्देश एकच 'स्वराज्य हित रक्षण' कठीण प्रसंगी त्या डळमळल्या नाहीत, वैयक्तिक स्वार्थी जीवन त्यांच्या नशिबी नव्हते. शिवाय वैयक्तिक स्वार्थ हा विचारच त्यांना शिवला नाही. संभाजी महाराजांना वेळोवेळी उत्साह, आत्मविश्वास व समर्थ साथ दिली. येसूबाई म्हणजे त्यागी आणि निस्वार्थी जीवनाचा एक आदर्श होय. शिवाजी महाराजांचा आपल्या या आतिशय हुशार, धोरणी, सुसंस्कृत सुनेवर फार जीव होता.[३] असेच दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातही अनेक न्याय-निवाडे येसूबाईंनी केले. शिवाय शंभू राजे यांच्या वरील देशद्रोहाचा निवाडाही त्यांनीच केला. शंभू राजेवरील लावलेल्या गोदावरी प्रकरण, कलावंतींनी प्रकरण, शाक्य पंथ, कलशाभिषेक व देशद्रोहाचा आरोप, इत्यादी प्रसंगी त्यांनी दाखवलेले व्यवहार चातुर्य आणि धोरोदात्तपणा वाखानन्याजोगा आहे. माहेरचे संस्कार शिवाय लहानपणापासून राष्ट्रमाता जिजाउंचा सहवास व संस्कार या मधून येसूबाईची जडण-घडण आगदी गृहशिक्षणापासून ते राजनीती पर्यंत झाली. मराठी राज्याची उभारणी होत असताना शिवाजी महाराजांच्या राजकरणाचे व राजनीतीचे जवळून निरीक्षण करणाची संधी येसूबाईंना मिळाली[४]. राणी येसूबाईंच्या जीवनामध्ये अनेक कठीण प्रसंग आले. छत्रपती शंभू महाराज आग्रा येथेच बरेच दिवस राहिले हा प्रसंग व दिलेरखानास जाऊन मिळणे. हे संकट स्वराज्यावर होते तसेच राजघराण्यावरही होते. या दोन्ही प्रसंगी राणी येसूबाईंची मानसिक कोंडी झाली होती. संभाजी राजे दिलेरखानकडे गेल्याने चिंताग्रस्त झालेले शिवाजी महाराज येसूबाईंना म्हणतात, "सुनबाई लोक आम्हाला अवतारी पुरुष मानतात. परंतु संभाजी राजे मोघलांकडे गेल्याने आम्ही विवश झालो आहोत, यावर तुम्हीच काही उपाय सुचवा"[५], यावरून राणी येसूबाईशीही राजकीय सल्ला-मसलत छत्रपती शिवाजी महाराज करत आसावे. याच काळात त्यांना २६ जानेवारी १६७९ रोजी कन्यारत्न झाले. तिचे नाव भवानी ठेवण्यात आले. पुढे संभाजी राजे दिलेरखानाच्या नजरकैदेतून पन्हाळगडावर दाखल झाले. रायगडावरून राणी येसूबाईही पन्हाळगडावर गेल्या, रायगडावर मात्र राजे संभाजी यांच्या विरोधात कारभारी कारस्थान करीत होते. पन्हाळगडावर छत्रपती शिवाजी राजे व राजे संभाजी यांची भेट झाल्यानंतर लगेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे एकाएकी निधन होणे हा येसूबाई वरील मोठा आघात होता. कारण रायगडावरील कारभारी यांच्या महत्वाकांक्षा राणी येसूबाईंना माहीत होत्या. छत्रपतीचे निधन झाल्याचेही एक महिन्या पर्यन्त छत्रपती



PRINCIPAL Shivaji College, HINGOLI

संभाजी राजे व येसूबाई यांना रायगडावरून कळू दिले नाही. राणी सोयराबाई यांच्यावर दबाव टाकून कारभारी मंडळीने
राजारामाचे मंचकारोहण करून राजे संभाजीस अटक करण्याची मोहीम हाती घेतली जाते. परंतु सेनापति हंबीरराव मोहिते
यांच्या सहकार्याने संभाजी राजे हे सिंहासनारूढ होतात. १८ मे १६८२ मध्ये येसूबाईंच्या पोटी शाहूराजांचा जन्म झाला.
पुढे संभाजी राजे छत्रपती झाल्यानंतर त्यांना अनेक संकटाचा सामना करावा लागला. सतत युद्धावर जावे लागे. अशा प्रसंगी
येसूबाईंना 'सखीराज्ञी जयती'[5] असा शिक्का व मार्तबही दिला होता. तसेच 'अज रखतखाने सौ येसूबाई'[7] असा त्यांचा पत्राचा
मायना पत्रावर लिहीत असत. 'रखतखाना'[8] याचा अर्थ सल्ला देणारी सल्लागार समिति. संभाजी महाराजांच्या गैरहजेरीत
राजपत्रे देणे व राज्य व्यवस्थेचे आवश्यक ते हुकूम काढण्याचा अधिकार संभाजी राजांनी येसूबाईंना बहाल केलेला दिसतो.
येसूबाईंनी प्रशासनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्या आपल्या नावे राजपत्रही काढत. संभाजी राजे यांची
'राजाज्ञा' म्हणून त्या हुकूम काढीत असत. सर्वत्र बातमी राखणे, गुन्हेगाराची वासलात लावणे, कैदेत दक्षता लावून ठेवणे,[9] ही
कामे त्या जातीने करीत. शिवाजी महाराज मोहिमेवर असताना ज्या पद्धतीने राजमाता जिजाऊ सर्व राज्यकारभार पाहत
असे. त्याच पद्धतीने संभाजी महाराज युद्धावर असताना, आपल्यावर टाकलेली राज्यरक्षणाची जबाबदारी येसूबाईंनी
स्वतःवर घेतली. किशोर वयातच त्यांच्यावर राजकरणाचे व राजनीतीचे संस्कार घडले. म्हणूनच पुढे भविष्यात त्यांच्यावर
एकामागून एक भीषण संकटे कोसळली तरी त्यातून त्या धीरोदात्तपणे व मुत्सद्दीगिरीने निभावून गेल्या. जिजाऊचा स्वर्गवास
झाल्याने संभाजीराजे पोरके झाले. येसूबाईंचा तर आधार तुटला,परंतु तरीही त्या संभाजी राज्यांच्या 'आधार'[10] बनल्या.

महाराणी येसूबाई ह्या धर्मशिल व संस्कारी होत्या. संभाजीच्या आदेशानुसार राजमंदीर बांधनाऱ्या अर्जोजी यादव यांना
येसूबाईंनी पाच हजार रुपये बक्षिस दिले. शिवाय चाफळ, चिंचवड, लिंब येथील मठांना कोणताही उपद्रव होऊ नये अशी
संभाजी राज्यांची इच्छा असल्याने येसूबाईंनी या मठांना कोणत्याही गोष्टीची कमी पडू दिली नाही. येसूबाई ह्या संस्काराची
सावली होत्या. संभाजी विरोधात कट केल्याबाबत राजे संभाजी यांनी अण्णाजी दत्तो, सोमाजी दत्तो, बाळाजी आवजी,
आवजी बामजी, हिरोजी फर्जन्द यांना जेव्हा हतीच्या पायी दिले. तेव्हा बाळाजी आवजीबद्दल येसूबाईंना दुःख झाले. मल्हार
रामराव चिटणीस यांनी आपल्या बखरित येसूबाई व संभाजी राजे यांच्यातील संवाद रेखाटला आहे. "बाळाजी प्रभू मरिले हे
उचित न केले, चिटणीस राज्याचे व आपले प्राण ऐसे म्हणत आले"[11] शिवाजी महाराजांनी त्यांना वंशपरंपरेने चिटणीशीचे
पत्र दिले होते. बाळाजी प्रभू यांचा काही अपराध नसतांना शिक्षा का? असे प्रश्न येसूबाईंनी राजे संभाजी यांना केले.
याबाबीचे प्रायश्चित म्हणून येसूबाईंनी आवजी बामजी यांचे दोन लहान मुले यांचा योग्य सांभाळ केला. त्यांचे सर्व दरबारी
काम येसूबाई करीत. खंडोबल्लाळ व विठोबल्लाळ यांना येसूबाईंनी पुत्रवत सांभाळून त्यांचे रक्षण केले. पुढे हीच दोन बंधु
महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये 'स्वामीनिष्ठ' म्हणून अमर झाली. याचे सर्व श्रेय महाराणी येसूबाईंनी केलेल्या संस्काराचे आहे
असेच म्हणावे लागते.

स्वराज्य नष्ट करण्याच्या उद्देशाने औरंगजेब दक्षिणेत आला होता. संभाजी महाराज मोगली फौजांशी झुंज देत होते.
औरंगजेबाने अनेक मराठा सरदारांना आमिषे दाखवून आपल्याकडे वळविले होते. त्यामध्ये रानी येसूबाई यांच्या माहेरचे
शिर्के हे ही होते. कवि कलश व शिर्के यांच्यातील वितुष्टमुळे दौलतराव शिर्के, गनोजी शिर्के मोगलांकडे गेले. ही बाब
येसूबाईंना अतिशय यातना दायक ठरली असेल. कारण शिर्के मोगलांकडे जाने हे स्वराज्याचे दुर्दैव तर होतेच पण खरे दुर्दैव
होते येसूबाईंचे.[12] या घटनेमुळे स्वराज्यावर मोठे संकट येऊन येसूबाईंचे सर्वस्व गेले. शिर्के यांच्या फितुरीमुळेच संभाजी राजे
यांना कैद झाली. संभाजी महाराजाचे हाल-हाल करून औरंगजेबाने ठार केले. ही वार्ता कळताच येसूबाईंवर आभाळ
कोसळले. त्यावेळी येसूबाईंना मरणप्राय यातना झाल्या असने स्वाभाविक आहे. पण याही परिस्थितित राणी येसूबाईने
धीरोदात्त व परकोटीच्या सहनशीलतेचे दर्शन घडविले. मोगलांच्या फौजा स्वराज्यात सर्व बाजूने घुसत होत्या, रायगडासही
जुल्फिकारखानाने वेढा दिला होता. यावेळी प्रमुख कारभारी यांना सोबत घेऊन 'स्वराज्य' हितासाठी राजाराम यांना
स्वराज्याचे छत्रपती म्हणून नेतृत्व देण्याचा आणि राजाराम महाराजांना रायगडाबाहेर पडायला सांगून आपण स्वतः रायगड
किल्ला लढविण्याचा विचार मांडला, कारण एका ठिकाणी सर्व कुटुंब राहणे यामध्ये स्वराज्य हित नाही, तर जिंजीकडे
जाऊन तिथे नवी राजधानी स्थापावी, असा सल्ला येसूबाईने दिला.[13] येसूबाईंने घेतलेले निर्णय दूरगामी परिणाम करणारे
ऐतिहासिक निर्णय होते. कारण जो गट संभाजी महाराजांचा विरोध करीत होता तो गट संभाजीच्या मृत्यूनंतर राजारामाचा
पक्ष घेऊन पुन्हा दुही निर्माण करण्याची शक्यता होतीच. परंतु येसूबाईंनीच राजारामाने छत्रपती व्हावे हा प्रस्ताव ठेवल्याने
दुहीस अवसरच मिळाला नाही. खरे म्हणजे यावेळी परंपरेप्रमाणे आपला पुत्र शाहू राजास गादीवर बसवून येसूबाईंनी
राजयकारभार हाती घेतला असता. तर काहीही वावगे झाले नसते. उलट त्यांना सर्व मराठी लोकांच्या सहानुभूतीचा आधार
मिळाला असता, पण येसूबाईने, सोयराबाई प्रमाणे पुत्रप्रेम न पाहता हिंदवी स्वराज्याचे हित पहिले. निस्सीम स्वराज्य प्रेम
आणि परकोटीचा स्वार्थत्याग या गुणांचा आदर्श येसूबाईंनी सर्व मराठ्यासमोर ठेवला होता.[14] या सर्व मसलतीचे महत्व डॉ.
जयसिंगराव पवार यांनी 'मराठेशाहीचा मागोवा' या ग्रंथात "हिंदवी स्वराज्य वाचविणारी महान मसलत"[15] असे म्हणतात



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

महाराणी येसूबाईचा गौरव केला आहे. या शिवाय स.मा.गर्गे 'करविर रियासतित' म्हणतात. 'रायगडावरील येसूबाईचे वर्तन अतिशय धीरोदात्त व शिवाजी महाराजांच्या सुनेला साजेशे असे होते. येसूबाईची स्वार्थनिरपेक्ष मसलत ऐकून सर्वांना धीर आला'[१६] खरे म्हणजे पतीच्या निधनानंतरही सर्वपरीने संकटांचा डोंगर उभा असूनही केवळ 'स्वराज्य हितासाठी' न डगमगता, मनाचा तोल सांभाळून घेतलेला निर्णय म्हणजे येसूबाईच्या मनाच्या धैर्योन्तुगतेचा कळस होय.

येसूबाईच्या निर्णयाला स्वराज्यातील मुलकी व लष्करी अधिकारी यांची स्वीकृती मिळाल्याने शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे शक्य झाले. खरे म्हणजे हिंदवी स्वराज्य म्हणजे केवळ भोसल्यांचे राज्य नव्हते. ते समस्त मराठ्यांचे राज्य होते. ही शिवछत्रपतींची शिकवण यावेळी उफाळून वर आली. या शिकवनूकीनेच सर्वांना भारावून टाकले. आणि पुढे त्यांच्या हातातून स्वराज्य रक्षणचे कार्य घडले. केवळ येसूबाईच्या रायगडावरील राजनैतिक सल्ल्यानुसार राजारामाने येसूबाईचा निरोप घेऊन आपल्या राण्या व प्रमुख मत्सुद्दी सेनानी यांच्यासह गुप्तपणे रायगड सोडला. व प्रतापगडाकडे प्रयाण केले. राजाराम राजे रायगडावरून निसटल्याची वार्ता औरंगजेवास समजली तेंव्हा रायगडाचा वेडा चालवीत आसलेला जुल्फिकारखानावर बादशाहाने ठपका ठेवला.[१७]

राजाराम महाराज प्रतापगडावरून पन्हाळ्यावर आले आहे असे, समजताच मोगली फौजा पन्हाळ्याकडे वळल्या, पन्हाळ्याचा वेढा कडक होण्यापूर्वीच राजाराम महाराजांनी निवडक अधिकारी व सेनानीसह २६ सप्टेंबर १६८९ रोजी कर्नाटकातील जिंजीकडे प्रयाण केले. रायगडाचा वेढा मात्र अधिक कडक होत गेला. शिवाय स्वराज्यातील परस्थितीही बिकट होत होती. विशालगड, रांगना,गगनगड हे किल्ले सोडल्यास दक्षिण महाराष्ट्रातील मराठ्यांचे सर्व किल्ले मोगलच्या हाती आले.[१८] सर्वत्र राज्यात अंधकार होता, केवळ एकच बाब जमेची होती. स्वराज्याचे छत्रपती सुखरूप निसटून कर्नाटकत गेले होते. परंतु त्यांनाही कैद झाल्याची वार्ता सर्वत्र पसरली, ही वार्ता जरी खरी नसली, तरीही याचा फायद्दा जुल्फिकारखान घेणार हे नक्की, रायगडावरील येसूबाईचे नीतीधैर्य मोठे होते. परंतु परिस्थिती अतिशय नाजुक होती. तेंव्हा फार काळ आपण किल्ला लढवू शकणार नाही हे येसूबाई व इतरांना वाटणे स्वभाविकच होते. जेरीस येऊन किल्ला मोगलांच्या ताब्यात गेल्यापेक्षा सन्माननीय वाटाघाटीने किल्ला ताब्यात देण्याशिवाय येसूबाईसमोर पर्याय नव्हता.

मल्हार रामराव आपल्या बखरीमध्ये नोंदवितो की, बादशाहाने वेगमच्या सल्ल्याने शाहू महाराजास अभय दिले. जिवास धोका होणार नाही,असे वचन जुल्फिकारखानाने कुरानावर हात ठेवून घेतल्यावर किल्ला ताब्यात दिला, ही बाव मात्र वेगमच्या पात्रामुळे काल्पनिक वाटते. शिवाय सूर्याजी पिसाळ नावाच्या किल्लेदाराने गडाचे दरवाजे उघडल्यामुळे मजवूरीने येसूबाईंना किल्ला शत्रूच्या ताब्यात दिला असावा असाही काहीच आधार नाही. इतिहासकार भीमसेन सक्सेना म्हणतो की, "जुल्फिकारखानाच्या वेढ्यामुळे रायगडावरील शिबंदी इतकी मेटाकुटीस आली होती की त्यांना किल्ला मौगलांच्या हाती देण्याशिवाय पर्याय राहिला नाही"[१९] म्हणजे फितुरीने रायगड कावीज झाला नाही तर पर्याय नव्हता, तेंव्हा येसूबाईंनी किल्ला वाटाघाटी होऊन करार झाला, व नंतर रायगड येसूबाईंनी मोगलांच्या ताब्यात दिला. खरे म्हणजे सूर्याजी पिसाळ हा किल्लेदार नसून वाई परंगन्यातील ओझर्डे गावाचा पाटील होता. व्यक्तिमत्वाने असमाधानी असणारा. रायगडास वेढा पडला तेंव्हा तो मोगलांना मिळाला असे नाही तर, संभाजी राजेंच्या वधा अगोदरच सूर्याजी पिसाळ मोगलांकडे स्वराज्याचा कर चुकविल्यामुळे पळून गेला होता. सूर्याजीची रायगडच्या पडावामागील भूमिका ही 'मध्यस्थि'[२०] ची आहे फितुरीची नव्हे. परिस्थितीनुसार हे सूर्याजीचे वर्तन समजून घ्यावे लागते.

राजारामाच्या पलायना मागे अनेक तर्क-वितर्क लावले जातात. शिवचरित्र प्रदीप लिखित ग्रंथामध्ये पृ.३५ मध्ये राजाराम आपल्या बायका-मुलांसह संभाजी महाराजांच्या कुटुंवाला मागे ठेऊन रायगडावरून पळून गेला. अशी नोंद मोगलांचा इतिहासकार साकी मुस्तेदखान करतो. परंतु रायगड जुल्फिकारखानाच्या ताब्यात दिल्या नंतर जेंव्हा येसूबाईंना कैद होते, तेंव्हा बादशहासमोर आपल्या असाह्य स्थितीचे वर्णन करताना आपणास फसविले. अशीच भूमिका येसूबाई घेतात. साकी मुस्तेदखानाचे हे विधान यावर आधारित आहे. यापाठीमागे येसूबाईचे डावपेच, राजकारणच होते.[२१] कारण औरंगजेबापासून आपले कुटुंब सुरक्षित राहावे हाच यापाठीमागचा उद्देश असावा हे स्पष्ट होते.

जुलफिकारखानाशी झालेल्या कराराप्रमाणे येसूबाईंनी किल्ला ताब्यात दिला. येसूबाई व शाहूराजे यांना बादशाही छावणीत ठेवण्यात आले. येसूबाईसोबत असलेल्या सर्व व्यक्तीची व्यवस्था बादशाहाने केली. शाहूमहाराजास शिक्षणाच्या सोईबरोबरच मान-पान व 'राजा' ही पदवी वहाल केली. यानंतर येसूबाईचा प्रवास हा बादशाही फर्मानानुसार झाला. नोव्हेंबर १६८९ पासून तुळजापूर, विजापूर, गलगली, व्रम्हपुरी, सातारा, परळी, भूषणगड, वारणेकाठी, पुणे, खेड, अहमदनगर असा १७०७ पर्यंत बादशाहाच्या छावणीसोबत त्यांना प्रवास करावा लागला.[२२] त्यानंतर मात्र त्यांना दूर उत्तरेत जावे लागले. शहजादा आज्जम १७०७ मध्ये दिल्लीकडे निघाला, सोबत येसूबाई आणि सर्व कबिला होता. परंतु वाटेतच आज्जम व मुअज्जम यांचे युद्ध होऊन आज्जम ठार झाला. मुअज्जमने मराठ्यांमध्ये गृहकलह व्हावा या साठी शाहूची सुटका केली. त्यामुळे शाहूशिवाय उत्तरेत १२ वर्षे येसूबाईंना अनेक संकटांना तोंड दयावे लागले. औरंगजेबाच्या



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

छावणीबरोबर त्यांना भटकावे लागले. पाऊस, थंडी, ऊन, वारा हे सर्व सोसावे लागले. एवढेच नव्हे तर दुष्काळाला तोंड देतांनी चिंचवडकर देवस्थानाला कर्ज देण्याबाबतचे पत्रही लिहावे लागले. पण या सर्व घटना मराठी मुलूकात झाल्या. जेव्हा राणी येसूबाई दिल्लीत गेल्या ते एन उन्हाळ्यात दिल्लीतील दमट वातावरणात त्यांना त्रास सोसावा लागला. राणी म्हणून रायगडावरील थंड वातावरणात राहणाऱ्या येसूबाईंना पुत्र शाहूचा वियोग सहन करून भिन्न भाषा, भिन्न संस्कृती, भिन्न धर्म आणि दिल्लीतील सत्तास्पर्धेतील क्रूर प्रसंग पाहताना त्यांना किती यातना झाल्या असाव्यात ही कल्पनाच भयावह आहे. लालकिल्ल्यातील त्यांच्या दिनचर्येसंबंधी मात्र माहिती मिळत नाही. जदूनाथ सरकार म्हणतात, "रायगडाच्या अभिषिक्त राणीला लाल किल्ल्यात विषयलालची मोगली मनापासून किती सावधपणे राहावे लागले असेल!" येसूबाईंना लालकिल्यातून सुखरूप स्वमुलूकात आणण्यामध्ये बाळाजी विश्वनाथाचे योगदान मोठे आहे. विविध राजकीय डावपेच आखून बाळाजी विश्वनाथ यांच्या सोबत राणी येसूबाई व इतर लवाजमा यांच्यासह दिनांक ४ जुलै १७१९ ला साताऱ्यात पोहचल्या.[२३] तब्बल २९ वर्ष ८ महीने १९ दिवसानी राणी येसूबाई स्वदेशी परतल्या. आणि एका दीर्घ कैदेचा अंत झाला.

महाराणी येसूबाई अतिशय धर्मशील होत्या, मोगली छावणीतही त्यांनी आपल्या देव-देवता आणि धर्म जागृत ठेवले. औरंगजेबाने शाहू महाराजांनी मुस्लिम धर्माचा स्वीकार करावा असा प्रयत्न केला. पण शाहू महाराजांनी मुस्लिम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. या पाठीमागील सर्व श्रेय येसूबाईंचेच होते. स्वदेशी परत आल्या नंतर येसूबाईंनी शाहू महाराजांना प्रशासनातही हातभार लावला. शाहू महाराज राजगादीवर बसल्यानंतर प्रजेला त्यांनी मोगलाईतून सोडविले. सहिष्णू व मृदु स्वभावाने सरदारांची मने जिंकली, व त्यांच्या पराक्रमास वाव दिला. हे सर्व शाहू महाराजांवर येसूबाईंच्या संस्काराचे फलित आहे. असेच म्हणावे लागेल. शिवाजी महाराजाच्या निर्वानानंतर जर सोयराबाईंनी, येसूबाईंसारखी उदात्त व निस्वार्थी भूमिका घेतली आसती तर संभाजी महाराजांचा इतिहास वेगळा राहिला असता. रायगडावरील गृहकलहास वावच मिळाला नसता. संभाजी महाराजांच्या वधानंतर मात्र येसूबाईंनी हे न होऊ देता आपल्या दिरास समोर केले. ही येसूबाईची भूमिका इतिहासामध्ये गौरवस्पद आहे. कोल्हापूरचे राजे संभाजी आणि शाहू महाराज यांच्यात जो वारणाकाठी संघर्ष झाला तो येसूबाईंना नको होता. त्यांनी आपले आयुष्य वेचले स्वराज्य हितासाठी, म्हणुन जो वारणेचा तह झाला, हा तह सुद्धा येसूबाईंच्या इच्छेसअनुसरून घडून येऊन दोन छत्रपतीमध्ये दिलजमाई घडून आली.[२४] वयाची ३०-३१ वर्षे कैदेत राहूनही शेवटचे दिवस मात्र राणी येसूबाईचे सुखात राजमाता म्हणून गेले. शाहू महाराजांचा उत्कर्ष पाहून त्या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर मात्र समाधानी होत्या. इ.स.१७३१ मध्ये वयाच्या ७० व्या वर्षी साताऱ्याजवळील संगम माहुली येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराज्ञी येसूबाईचे शेवटचे दिवस आनंदी व समाधानी गेल्याने त्या धन्य झाल्या.

सारांश

मराठ्यांच्या इतिहासामध्ये महाराणी येसूबाई यांचे स्थान मोठे आहे. पतीवर निखल माया व प्रेम करणारी येसबाई इतिहासात अमर झाली आहे. शिवाजी महाराजांचा 'स्वराज्य' हित हा विचार त्यांनी आयुष्यभर जोपासला. त्यासाठी स्वतःच्या दुःखाची व कष्टाची पर्वा केली नाही. अत्यंत कठीण प्रसंगी स्वराज्यास येसूबाईनी तारले. संभाजी महाराजांच्या स्वभावाचे बारीक निरीक्षण करून योग्य सल्ला देणाऱ्या अर्धांगिनी म्हणूनही त्यांचे स्थान अद्वितीय आहे.

महाराणी येसूबाईमध्ये अनेक महनिय गुण होते. त्यांच्या आचार व विचारातील धीरोदात्तपणा, निस्पृहता, स्वराज्यानिष्ठा, महाराष्ट्रधर्माभिमान, याशिवाय संकटकालातही विचलित न होण्याचा निगृहिपणा, प्रतिकूल परस्थितीशी सामना करण्याची साहसीवृत्ती आणि आशावादी प्रवृत्ती यामुळे मराठ्यांच्या इतिहासात राष्ट्रमाता जिजाऊ नंतर स्वराज्य प्रेमी व स्वराज्यनिष्ठेचे रक्षण करणारी स्त्री म्हणून येसूबाईची गणना होते. येसूबाई म्हणजे स्वार्थत्यागाची मुर्तिमंत सगुण मूर्ति. सयंमी आणि धीरोदात्तपणा धारण करणारी एक धैर्यशालिनी शांतीदूर्ग म्हणून इतिहासात अत्युच्य स्थानावर पोहोचल्या आहे. कारण शत्रूच्या छापनीतही त्या स्वाभिमानी बाण्याने राहिल्या, सत्व व अस्मिता विसरली नाही. शिवाजी महाराजांच्या सून म्हणून महाराणी येसूबाई धैर्याच्या, शौर्याच्या व मुत्सद्देगिरीच्या परंपरेस जागल्या आणि म्हणूनच त्या मराठ्यांच्या इतिहासात अमर झाल्या.

स्वराज्य हितासाठी राजारामास छत्रपती घोषित करून स्वतः संकटास सामोरे जाणे हा महाराणी येसूबाईंचा त्याग मराठ्यांना पराक्रमाला जागृत ठेवण्यास कारणीभूत झाला. या पराक्रमाणेच मराठ्यांचे राज्य संपविण्यासाठी आलेल्या औरंगजेबास याच मुलूकात शेवटचा श्वास घ्यावा लागला. परंतु स्वराज्य संपविता आले नाही. यामागील खरे श्रेय हे महाराणी येसूबाईच्या त्यागाचे आहे. महाराणी येसूबाईंचे भाग्य की त्या छत्रपतींच्या सून होत्या. राजाच्या राज्ञीपणाचा मान ही त्यांना मिळाला. पण सुखाचे दिवस त्यांना फार कमी लाभले. संभाजी महाराजांनी स्वाभिमानी मृत्यू स्वीकारला आणि येसूबाईंनी जिवंतपणे मृत्युला मुठीत ठेवले. महाराणी येसूबाईंचे मराठ्यांच्या इतिहासातील स्थान फार वेगळे आहे. आपल्या मोशीक, सोज्वळ आणि सात्विक, धीरोदात्त, निस्वार्थी वागणुकीने हे स्वराज्य पुन्हा उभे करण्यामध्ये त्यांनी ३० वर्षे कैद स्विकारली, वनवास सहन केला, या त्यागास तोड नाही. वा.सी वेंद्रे यांनी महाराणी येसूबाईचा गौरव "छत्रपती [illegible]



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

29

महाराज' या ग्रंथात केला आहे. "वीरस्नुषा, वीरकन्या, वीरपत्नी व वीरमाता म्हणून येसूबाईंचे कार्य व कर्तृत्व फार मोठे आहे" येसूबाईंनी प्रत्येक्ष हातात शस्त्र घेऊन रणांगण गाजविले नसेल. परंतु आपल्या मुत्सद्देगिरीने, शहानपणाने आणि सौजन्यपूर्ण वागणुकीने येसूबाईने मराठी राज्य स्वयंपूर्ण बनवनिण्यास मदत केली. मराठ्यांच्या इतिहासामध्ये राजकारणी स्त्रियांमध्ये येसूबाईंचे स्थान हे अद्वितीय, अनन्यसाधारण आहे.

महाराणी येसूबाईंचे संपूर्ण जीवन संकटाचे डोंगर पेलण्यातच गेले. परंतु काही बाबी मात्र सुदैवी ठरल्या, त्या म्हणजे त्यांच्या कारकीर्दीचा प्रारंभ जसा वैभवी घटनांनी झाला. तसाच शेवटही आपल्या पूत्राच्या वैभवाच्या उत्कर्षदर्शनाने झाला. ज्या मुघल सत्तेने त्यांना कैदेत ठेवले, ती सत्ता नष्ट होऊन आपल्या पूत्राच्या सत्तेचा विकास होत असल्याचा योगही त्यांच्या आयुष्यात आला. राष्ट्रमाता जिजाऊ प्रमाणेच येसूबाईंनाही राजमाता होऊन समाधानाने मृत्यू आला. हेच महाराज्ञी येसूबाईंचे भाग्य.

संदर्भ सूची

१. डॉ. सदाशिव शिवदे, संभाजीराजा, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००८, पृ.१०
२. डॉ. जयसिंहराव पवार, मराठेशाहीचा मागोवा, मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर, १९९६, पृ.२५
३. प्रा. सू.ह. जोशी, मराठेकालीन शौर्यकथा, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८, पृ.३४-३५
४. डॉ.मिराशी मिना, महाराणी येसूबाई, कॉटीनेन्टल प्रकाशन पुणे, १९९९, पृ. ७-१२
५. प्रा. सीताराम काकडे (सपा), कुलवाडीभूषण राजा शिवछत्रपती, पार्वती प्रकाशन, अहमदनगर ,२०१०, पृ. १७९
६. कित्ता, पृ.१७८
७. डॉ. सदाशिव स. शिवदे, महाराणी येसूबाई, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४, पृ.५०
८. सावंत शंकरराव, हुतात्मा संभाजी एक विवाद्य व्यक्तिमत्व, नवभारत प्रकाशन संस्था मुंबई ,१९९१, पृ. ३०-३५
९. प्रा. सौ.माधवी कवि, १०१ श्रेष्ठ महिला, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ. ३३
१०.डॉ.सदाशिव स. शिवदे, महाराणी येसूबाई, पूर्वोक्त, पृ. १३
११. कित्ता, पृ. ४९
१२. कित्ता, पृ. ७४
१३. भीमसेन सक्सेना अनू. सेतु माधवराव पगडी, मोगल आणि मराठे, ठोकळ प्रकाशन, पुणे,१९९३ पृ.(प्रस्तावना)
१४. डॉ. जयसिंहराव पवार, मराठेशाहीचा मागोवा, पूर्वोक्त, पृ. १००
१५. कित्ता, पृ.१३९
१६. सदाशिव स. शिवदे, महाराणी येसूबाई, पूर्वोक्त, पृ.९०
१७. ईश्वरदास नागर, भाषांतर – सेतु माधवराव पगडी, मोगल मराठा संघर्ष, चित्राशाळा प्रेस पुणे, १९६४, पृ. ७०
१८. डॉ. जयसिंहराव पवार, मराठेशाहीचा मागोवा, पूर्वोक्त, पृ. १०२
१९. कित्ता, पृ. १०४
२०. कित्ता, पृ.११२
२१. ग. ह. खरे व सेतु माधवराव पगडी(भाषांतर), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाश, पुणे, १९६३, पृ. ४३-४४
२२. डॉ. सदाशिव स. शिवदे, महाराणी येसूबाई, पूर्वोक्त, पृ. १३४-१३५
२३. वी. गो. खोबरेकर, मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम, मुंबई इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन, मुंबई, १९७७, पृ. (प्रस्तावना)
२४. डॉ. सदाशिव स. शिवदे, महाराणी येसूबाई, पूर्वोक्त, पृ. १५२


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

# RESEARCH JOURNEY

ISSN- 2348-7143

Impact Factor 6.261

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

RESEARCH JOURNEY

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Visit to - www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATION

31